# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- ११/१२/२०२२ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ११.१२.२०२२ | पुण्यनगरी पु. पा .०१ | रस्त्यावर मद्य पिणा-यांकडे काना डोळा | काशिमीरा | |
| २. | ११.१२.२०२२ | पुढारी पा. नं .०७ | बुलेट ट्रेन मार्गावरील झाडे कापण्यास काँग्रेस, पर्यावरण समितीचा विरोध | वसई-विरार | |
| ३. | ११.१२.२०२२ | पुण्यनगरी पु. पा. ०१ | मालमत्ता कर वसूलीसाठी पाणी बंद करू नका | मिरा-भाईंदर | |
| ४. | ११.१२.२०२२ | सामना पा .नं .१ व ४ | चंद्रकांत पाटील यांच्यावर शाईफेक | इतर | |
| ५. | ११.१२.२०२२ | लोकमत पु. पा.०३ | “स्पा”च्या आडून अनैतिक प्रकार., चार जणांना अअक | नवघर | |
| ६. | ११.१२.२०२२ | लोकमत पु. पा.०३ | तीन बालकामगारांची भाईंदर मधून सुटका | नवघर | |
| ७. | ११.१२.२०२२ | लोकमत पा. नं .०५ | चंद्रकांत पाटलावर गुन्हा नोंदवा | विरार | |
| ८. | ११.१२.२०२२ | लोकमत पा. नं .०५ | अल्पवयीन मुलीचे अपहरण | तुळींज | |
| ९. | ११.१२.२०२२ | लोकमत पा. नं .०५ | लग्नाचे आमिष दाखवून बलत्कार | नालासोपारा | |
| १०. | ११.१२.२०२२ | लोकसत्ता पा. नं. ०७ | वाहनात महिलेचा विनयभंग | मांडवी | |

पुण्यनगरी पृ. ५ पा. ९.

# रस्त्यावर मद्य पिणाऱ्यांकडे काना डोळा

## पोलीस, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुर्लक्ष

**मीरा रोड :** काशिमीरा येथील जरिमरी मंदिराजवळ असलेल्या वाईन्स शॉपच्या आजूबाजूला



उघड्यावर, रस्त्यावर बसून दारू पिणाऱ्यांनी हैदोस घातला आहे. त्या रस्त्यावर दोन्ही बाजूने मालवाहतुकीच्या गाड्या उभ्या केल्या जात असल्याने नेहमी वाहतूक कोंडी होते. या गाड्यांच्या बाजूला बसून मद्यपी पित बसलेले असतात. याकडे पोलीस, वाहतूक पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभाग दुर्लक्ष करत आहे. यामुळे महिलांची सुरक्षा धोक्यात आली आहे.

मीरा-भाईंदर शहरात अनेक हॉटेल, चायनीज चालक, वाइन्स शॉपच्या आजूबाजूला, तसेच बीयर शॉपमध्ये परवानगी नसताना मद्यपी पित असल्याचे दिसून येते. याकडे पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभाग दुर्लक्ष करत आहे. वाइन्स शॉप, बीयर शॉपमधून दारू विकत घ्या व कोणत्याही हॉटेलमध्ये, रस्त्यावर बसून प्या, असे मद्यपींचे वर्तन असल्याचे दिसून येते. काही वेळा पोलिसांकडून तात्पुरती कारवाई होते; परंतु राज्य उत्पादन विभाग कारवाई करत नसल्याने या प्रकारात वाढ होत आहे.जरिमरी मंदिराच्या बाजूला फुटपाथवर दररोज रात्री उशिरापर्यंत मद्यपी दारू पित बसलेले असतात. या रस्त्याने रात्री महिला, मुली ये-जा करतात. एखादी दुर्घटना घडली तर त्याला जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. महिलांची सुरक्षा धोक्यात आली आहे. पोलिसांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

पुढारी पा. नं. ८

# बुलेट ट्रेन मार्गावरील झाडे कापण्यास काँग्रेस, पर्यावरण समितीचा विरोध

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे म्हणजेच बुलेट ट्रेनच्या मार्गावरील हजारो झाडे कापण्यात येणार असून वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत त्यावर हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. त्यासंदर्भात पर्यावरण संवर्धन समिती, वसई-विरार आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पर्यावरण विभागातर्फे या वृक्षतोडीविरोधात हरकत घेण्यात आली आहे

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या मार्गावरील हजारो झाडे कापण्यात येणार असून, पर्यावरण संवर्धन समिती, वसई-विरार आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पर्यावरण विभागाचे अध्यक्ष समीर वर्तक यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या शिष्टमंडळाने वसई-विरार शहर महानगरपालिकेला लेखी पत्र देऊन या वृक्षतोडीविरोधात हरकत घेण्यात आली आहे.

पुण्यनगरी ५.पा.१.

# मालमत्ता कर वसुलीसाठी पाणी बंद करू नका!

## मानवी हक्क आयोगाचे पालिकेला आदेश

**। मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिका शहरातील मालमत्ता कर न भरणाऱ्या नागरिकांचे पाण्याचे कनेक्शन तोडून पाणी बंद केले जात होते. त्यामुळे पाणी कनेक्शन तोडू नये, यासाठी नागरिक घाबरून थकीत मालमत्ता कर भरत होते. काही महिन्यांपूर्वी या कारवाईविरोधात मानवी हक्क आयोगाकडे तक्रार करण्यात आली होती. यावर निर्णय देताना थकीत करवसुलीसाठी नळ कनेक्शन तोडून पाणी बंद करू नये, असे आदेश दिले आहेत.

महापालिकेचा मालमत्ता कर हा उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. या वसुलीवर शहरातील अनेक विकासाची कामे केली जातात. अनेक नागरिक हे दरवर्षी मालमत्ता कर भरत नसल्यामुळे थकीत कर वाढत जातो. कर वसूल होणाऱ्या उत्पन्नाचा अपेक्षित आकडा अर्थसंकल्प तयार करताना निश्चित केला जातो. त्यानुसार नवीन अर्थसंकल्प तयार केला जातो.



हे अपेक्षित उत्पन्न मार्च महिना संपेपर्यंत जमा होणे आवश्यक आहे. त्यामुळे जानेवारी महिन्यापासून थकबाकीदारांना मालमत्ता कर वसूल करण्यासाठी प्रथम नोटिसा पाठवल्या जातात. नोटिसा पाठवूनही कर भरला नाही तर नळजोडणी खंडित करण्याची कारवाई केली जाते. त्यामुळे ही कारवाई मानवी हक्कांविरोधात असल्याचे सांगत त्याविरोधात तुषार देहेकर यांनी राज्य मानवी हक्क आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीवर निर्णय देताना मानवी हक्क आयोगाने महापालिकेने थकीत कर वसुलीसाठी पाण्याची जोडणी खंडित करू नये, असे आदेश दिले आहेत.

महापालिकेला हे आदेश प्राप्त झाले असून त्यावर सर्व प्रभाग अधिकारी व कर निरीक्षकांना महापालिकेने नळ जोडणी खंडित करू नये, असे आदेश देण्यात आले आहेत. थकीत मालमत्ता करधारकांना कायदेशीर नोटिसा पाठवल्यानंतरच योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे. पूर्वी मालमत्ता देयकात नळ जोडणी खंडित करण्याचा टाकलेला मजकूर काढण्यात आल्याचे शपथपत्र उपायुक्तांनी मानवी हक्क आयोगाकडे सादर केले आहे. मीरा-भाईंदर महापालिकेला या वर्षी मालमत्ता करातून २८० कोटींचे उत्पन्न मिळणे अपेक्षित आहे. आतापर्यंत सुमारे १२० कोटींची वसुली करण्यात आली आहे. नळ जोडणी खंडित करण्याच्या कारवाईमुळे थकीत कर लवकर वसूल होत होता. आता बाकी असलेली वसुली येत्या साडेतीन महिन्यांत पूर्ण करण्याचे आव्हान पालिकेपुढे आहे. यंदा करवसुलीसाठी मालमत्ता जप्त करण्यासह अन्य पर्यायी उपाययोजना व नियमानुसार केली जाणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

सामना पा. नं. १५४.

## फुले, आंबेडकर, कर्मवीरांच्या अवमानाचे पडसाद .

# चंद्रकांत पाटील यांच्यावर शाईफेक!

## पिंपरी-चिंचवड येथील घटना

पिंपरी, दि. १० (प्रतिनिधी) - कर्मवीर भाऊराव पाटील, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले या थोर पुरुषांचा घोर अवमान करणाऱ्या उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर शाईफेक करण्यात आली. आज चिंचवड गावात एका कार्यक्रमासाठी आलेले असताना हा प्रकार घडला. कडेकोट पोलीस बंदोबस्त, सुरक्षारक्षकांचा गराडा असतानाही अचानक मंत्र्यांवर शाईफेकीची घटना घडल्याने गोंधळ उडाला. दरम्यान, या घटनेचा सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी निषेध केला आहे.

पैठण येथील संतपीठाच्या कार्यक्रमात शुक्रवारी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी वादग्रस्त विधान केले. 'कर्मवीर भाऊराव पाटील, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ▮ पान ४



## तोंडपाटीलकी विरोधात संताप... संताप... संताप

सांगलीत महाविकास आघाडीच्या वतीने मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रतिमेची गाढवावरून धिंड काढत त्यांच्या प्रतिमेला 'जोडे मारो' आंदोलन करण्यात आले.

कोल्हापुरात वंचित आघाडीच्या वतीने पाटील यांच्या प्रतीकात्मक प्रतिमेला 'जोडो मारो' आंदोलन करण्यात आले. दसरा चौक येथे हे आंदोलन झाले.

नगर शहर शिवसेनेच्या वतीने माळीवाडा येथे मंत्री पाटील यांच्या प्रतिमेवर चिल्लर फेकून आंदोलन करण्यात आले.

---

# चंद्रकांत पाटील यांच्यावर शाईफेक!

*(पान १ वरून)* आणि महात्मा जोतिबा फुले यांनी भीक मागून शाळा उभारल्या,' असे संतापजनक वक्तव्य पाटील यांनी केले. या वक्तव्याचे तीव्र पडसाद राज्यभर उमटत आहेत. विविध राजकीय पक्ष, संस्था-संघटनांनी सनदशीर मार्गाने निषेध नोंदविला. कुठे त्यांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले, तर कुठे घोषणाबाजी करण्यात आली.

आज सायंकाळी पाच वाजता उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पिंपरी-चिंचवड येथे श्रीमान महासाधू श्री मोरया गोसावी संजीवन समाधी महोत्सवाचा उद्घाटन कार्यक्रम होता. त्यानुसार पाटील यांचे कडेकोट पोलीस बंदोबस्तात, चिंचवडगावात आगमन झाले. भाजपचे माजी नगरसेवक ॲड. मोरेश्वर शेडगे यांच्या निवासस्थानी त्यांनी भेट देत चहापान केले. निवासस्थानातून बाहेर पडत असतानाच तेथे काहीजण घुसले आणि एक तरुण पाटील यांच्या दिशेने झेपावला. काही कळायच्या आतच त्या व्यक्तीने पाटील यांच्यावर शाई फेकली आणि घोषणाबाजी केली. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर झिंदाबाद' अशा घोषणा दिल्या. अचानक घडलेल्या घटनेनंतर बेसावध असलेल्या चंद्रकांत पाटील यांचा तोल गेला. स्वीय सहायक, पोलिसांनी त्यांना सावरले. तर, पोलिसांनी शाईफेक करणाऱ्या आंदोलकाला ताब्यात घेतले. त्याच्यासमवेत आलेल्या अन्य आंदोलकांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

**हिंमत असेल तर समोरून या! - चंद्रकांत पाटील**

'मी कोणालाही घाबरत नाही. मी रडणारा नव्हे, तर लढणारा माणूस आहे,' अशी प्रतिक्रिया चंद्रकांत पाटील यांनी दिली. "इलेक्ट्रॉनिक मीडियाने माझ्या वक्तव्याचा विपर्यास करीत महाराष्ट्र पेटविला. पराचा कावळा केला. तीन-तीन वेळा खुलासा केल्यावर, दिलगिरी व्यक्त केल्यानंतरही भ्याडपणाने शाईफेक झाली. हिंमत असेल तर समोरून या. चला पोलीस डिपार्टमेंट बाजूला करतो, असे पाटील म्हणाले.



▮ संपूर्ण महाराष्ट्रात चंद्रकांत पाटील यांचा निषेध होत असतानाच मागासवर्गीयसाठी राखीव असलेल्या मतदारसंघातून निवडून आलेले आमदार संजय शिरसाठ यांच्या निवासस्थानी मात्र शनिवारी चंद्रकांत पाटील यांचे पंचारतीने ओवाळून स्वागत करण्यात आले.

लोकमत ५-१२-२०

# ‘स्पा’च्या आडून अनैतिक प्रकार; चार जणांना अटक



लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडच्या रामदेव पार्क भागात एका मसाज-स्पा सेंटरच्या आड अनैतिक प्रकार चालविले जात असल्याचे पोलिसांच्या छाप्यात उघडकीस आले आहे. येथून तीन महिलांसह चौघांना अटक केली आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या मध्यवर्ती गुन्हे शाखेचे मनोहर तावरे यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे रामदेव पार्क मार्गावरील बेथल इमारतीत ‘नॅचरल केअर स्पा’ नावाने महिला अनैतिक प्रकार करत असतात, असे कळले. त्यानुसार सहायक निरीक्षक बेंद्रे, तावरे यांच्यासह पथकाने शुक्रवारी बोगस गिऱ्हाईकाला स्पामध्ये पाठवले. त्यानंतर खात्री पटताच पोलिसांनी छापा मारला. यावेळी आत पार्टिशन टाकून लहान-लहान खोल्या तयार केल्या गेल्याचे व त्यात महिला अनैतिक प्रकार करत असल्याचे आढळले. पोलिसांनी याप्रकरणी स्पाचा कर्मचारी मैनुद्दीन वकील अहमद याच्यासह तीन महिलांना पकडले. या चौघांसह स्पाचा मालक राजेशकुमार वर्मा (रा. नालासोपारा) अशा पाचजणांवर नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत ५-१२-२०

# तीन बालकामगारांची भाईंदरमधून सुटका

## अनैतिक मानवी वाहतूक शाखेची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या एका औद्योगिक वसाहतीत इलेक्ट्रिक लोखंडी भट्टी, प्रेस व कटिंग मशीनवर कामास जुंपलेल्या तीन बालकामगारांची सुटका पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक शाखेने गुरुवारी केली. याप्रकरणी नवघर पोलिस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे.

भाईंदर पूर्वेच्या मच्छी मार्केटजवळ उद्योग इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये पारस एंटरप्रायझेस नावाने बालकामगारांकडून धोकादायक काम करून घेतले जात असल्याची माहिती मिळाल्यावर पोलिस निरीक्षक समीर अहिरराव यांच्यासह केशव शिंदे, विजय निलंगे, उमेश पाटील, नमिता यादव यांच्या पथकाने गुरुवार, ८ डिसेंबरला गाळ्यावर छापा टाकला. तेथे एक अल्पवयीन मुलगा स्टील वाट्यांना गरम करण्यासाठीच्या इलेक्ट्रिक भट्टीवर, तर दोन अल्पवयीन मुले इलेक्ट्रिक प्रेस व कटिंग मशीनवर काम करताना आढळले. व्यवस्थापक किशनकुमार यादव याला पोलिसांनी ताब्यात घेत चौकशी केली असता अल्पवयीन मुलांना कमी पगारात राबवले जात असल्याचे उघड झाले आहे. कारखान्याचा मालक जसवंत हा सापडला नाही. याप्रकरणी नवघर पोलिस ठाण्यात जसवंत व यादव यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

लोकमत पा.नं. ५.

लोकसत्ता पा.नं.७.

## 'चंद्रकांत पाटलांवर गुन्हा नोंदवा'

**विरार :** उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी महापुरुषांच्या विरोधात केलेल्या वक्तव्यावरून शहरातील सर्व पक्षीय पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत विरारच्या पोलिस ठाण्यात त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी ठिय्या आंदोलन केले. सर्वपक्षीय पदाधिकारी विरार पोलिस ठाण्यात शनिवारी सायंकाळी एकत्रित आले होते. त्यांनी पाटील यांच्या विरोधात घोषणाबाजी करीत निषेध व्यक्त केला. गुन्हा दाखल न झाल्यास तीव्र आंदोलन करू, अशा इशाराही दिला.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

**नालासोपारा :** तुळींज पोलिस ठाण्याच्या हद्दीतून एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. सेवालाल नगर येथे काकांच्या घरी राहण्यासाठी आलेली सोळा वर्षांची मुलगी ६ डिसेंबरला सकाळी नऊच्या सुमारास मालाड येथे कॉलेजमध्ये परीक्षेसाठी गेली होती. त्यानंतर ती नालासोपाऱ्यात पुन्हा काकांकडे किंवा मुंबईतील तिच्या घरी पोहोचली नव्हती. त्यामुळे तिचे आरोपीने अपहरण केल्याच्या संशयाने मुलीच्या वडिलांनी गुरुवारी तुळींज पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार

**नालासोपारा :** लग्नाचे आमिष दाखवून एका २१ वर्षीय तरुणीवर बलात्कार करण्यात आल्याची घटना नालासोपारा येथे उघडकीस आली आहे. शहरात राहणाऱ्या एका तरुणीला एप्रिल २०१९ ते १ नोव्हेंबर २०२२ यादरम्यान सातीवली येथील आरोपी तरुणाने लग्नाचे आमिष दाखवून कळंब बीचवरील लॉजवर नेऊन तिच्यावरती अनेक वेळा लैंगिक अत्याचार केला होता. तसेच विरार येथील एका मंदिरात लग्न करून तिला घरी न नेता आरोपीने तिची फसवणूक केली.

# वाहनात महिलेचा विनयभंग

## उडी मारल्याने चिमुकलीचा मृत्यू

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** खासगी गाडीतील वाहनचालक आणि प्रवाशांनी विनयभंगाचा प्रयत्न केल्यामुळे एका वीस वर्षीय महिलेने आपल्या चिमुकल्या मुलीसह धावत्या गाडीतून उडी मारली. या घटनेत दहा महिन्यांच्या चिमुकलीचा मृत्यू झाला तर ही महिला जखमी झाली. या प्रकरणी विरारच्या मांडवी पोलीस ठाण्यात वाहनचालक आणि इतर तीन अनोळखी प्रवाशाविरोधात विनयभंग आणि हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाडा येथे राहणारी २० वर्षांची महिला दहा महिन्यांच्या मुलीसह नालासोपारा पूर्वेच्या पेल्हार गावातील आपल्या नातेवाईकांकडे आली होती. शनिवारी सकाळी ती वाडा येथे परत जाण्यासाठी निघाली होती. खासगी प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या इको वाहनात ती मुलीसह बसली या वेळी वाहनांमध्ये अन्य तीन प्रवासी होते. ते मुंबई अहमदाबाद महामार्गावरील पेल्हारजवळील नोवेल्टी हॉटेलच्या समोरून जात असताना या महिलेने मुलीसह गाडीतून उडी मारली. या घटनेमध्ये मुलीचा मृत्यू झाला तर महिला जखमी झाली. वाहनचालक तसेच इतर प्रवाशांनी माझा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला म्हणून मी मुलीसह उडी मारल्याचे तिने पोलिसांना सांगितले.

या प्रकरणी मांडवी पोलीस ठाण्यामध्ये वाहनचालक तसेच इतर प्रवाशांविरोधात विनयभंगाचा तसेच मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी वाहनचालकाला ताब्यात घेतले असून इतर प्रवाशांचा शोध सुरू आहे.

ही महिला सुरुवातीला आपला जबाब बदलत होती. मात्र उशिरा आम्ही तिच्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल केला आहे अशी माहिती मांडवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रफुल्ल वाघ यांनी दिली. अन्य प्रवाशांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.